International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# जॉन लॉक:- उदारमतवाद

**Madhuri Sakharamji Deshmukh**

Asst. Prof Poltical Science
Late Mrs. Kamaltai Jamkar Mahila Mahavidyalaya, Parbhani Srtmun

जॉन लॉकचा उदारमतवाद हा आधुनिक लोकशाहीचा पाया आहे. जॉन लॉकला उदारमतवादाचा जनक म्हटले जाते. १७ व्या शतकात इंग्लंड मध्यें होणाऱ्या राजकीय व धार्मिक घडामोडीतील चढ-उतार सुरू असताना जॉन लॉकच्या या उदारमतवादाने व्यक्तीला स्वातंत्र, अधिकार, राज्याचे मर्यादित अधिकारावर दृष्टीक्षेप टाकण्यास सुरुवात केली. लॉकच्या मते राज्याचे प्रमुख कार्य म्हणजे व्यकतीच्या हककाचे संरक्षण करणे होय. त्यांच्या विचारांचा असा परिणाम झाला की अमेरिका व फ्रान्स क्रांतीला वैचारिक दिशा मिळाली, लॉकच्या उदारमतवादातूनच आधुनिक लोकशाहीचा पाया घातला गेला. जॉन लॉकच्या विचारांनी पुढील लोक लोकशाही, राज्यघटना, मानवी हक्काचे सिद्धांत आणि आधुनिक राज्यशास्त्र यावर फार मोठा प्रभाव टाकला, त्याचे विचार अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा आणि राज्यक्रांतीच्या घोषणांवरही स्पष्टपणे दिसून येतो. म्हणूनच उदारमतवादाच्या ऐतिहासिक आणि बौद्धीक प्रवासात जॉन लॉकचा विचार निर्णायक मानला जातो. राजकीय, सामाजिक, आणि आर्थिक विचारधारेवर त्याचा मोठा प्रभाव राहिला.

**उदारमतवादाचा अर्थ –**

उदारमतवाद म्हणजे एक राजकीय आणि नैतिक विचारधारा आहे, जी व्यक्तीचे अधिकार स्वातंत्र्य आणि समानता यावर भर देते. उदारमतवाद एक वेगळी चळवळ बनली, जी, पाश्चात्य तत्वज्ञानी आणि अर्थशास्त्र यामध्ये लोकप्रिय झाली. उदारमतवादाने वरांपरंपरागत विशेषाधिकार, राज्यधर्म, निरपेक्ष राजेशाही, राजांचा दैवी अधिकार आणि पारंपारिक रुढीवाद या निकषांना प्रातिनिधिक लोकशाही कायदयाचे राज्य आणि कायद्याखालील समानतेने बदलण्याचा प्रयत्न केला.

जॉन लॉक हा 17 व्या शतकातील एक प्रसिद्ध विचारवत आहे. जॉनला उदारमतवादाचा जनक मानले जाते तसेच उदारमतवादाचा आत्मा म्हटले जाते. जॉन लॉकच्या "ट्रिटीज ऑन सिव्हील गव्हर्मेंट " या ग्रंथास 'स्वातंत्र्याचे, बायबल' असेही म्हणतात. उदारमतवादाच्या आधारस्तंभामध्ये जॉन लॉकचे नाव राजकीय विचाराच्या इतिहासात अमर आहे

**Ebenstein म्हणतो "The spirit of rational liberalism is best reflected is the work of of John Lock",**

जॉन लॉकला वास्तवादामध्ये इंग्लंडच्या उदारमतवादाचे मूळ स्त्रोत मानले आहे व्यक्ती हा लॉकच्या विचाराचा केंद्रबिंदू आहे. कारण लॉकचा प्रत्येक विचार व्यक्तीभोवती फिरत असतो. राज्याला व्यकती स्वातंत्र्य प्राप्तीचे साधन व्यकती मानतो, राज्य व्यकती साठी, आहे व्यक्ती राज्यासाठी नाही. असे लॉकचे मत आहे.व्यकती श्रेष्ठ आहे. राज्याची उत्पत्ती सामाजिक करारा्व्दारे सरकारची निर्मिती झाली असल्यामुळे, समाजाकडून "असल्यामुळे, सरकारचे कार्य समाजहिता च्या विरुद्ध असेल तर सरकारला बदलण्याचा संपूर्ण अधिकार समाजाला

असतो. सरकारची निर्मिती केल्यानंतर समाज निश्चितच झोपी जात नाही तर सरकारवर नियंत्रण ठेवतो. लॉक लॉक म्हणतो की "समाज असा एक ग्रह स्वामी आहे जो की आपल्या घराचे संरक्षण करण्यासाठी एका रखवालदाराची नेमणूक करतो तरी परंतु तो स्वतः झोपत नाही रात्रभर जागरण करून रखवालदार झोपला आहे किंवा नाही हे पाहत असतो "

लॉकच्या मते व्यक्ती तरर्कशील किंवा विवेकशील प्राणी आहे तो व्यक्तीच्या नैसर्गिक अधिकारावर ही भर देतो लाखच्या म्हणण्यानुसार नैसर्गिक अधिकारांमध्ये

**1) जीवन जगण्याचा अधिकार**

**2) व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार**

**3) मालमत्तेचा अधिकार**

इत्यादी अधिकारांचा समावेश होतो राज्याची निर्मिती व्यक्तीच्या नैसर्गिक अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी झाले आहे. लॉकचा धार्मिक सहिष्णुतेचा सिद्धांत हा उदारमतवादाला दिलेली एक मोठी देणगीच होय. प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार आपल्या अंतःकरणानुसार कोणताही धर्म स्वीकारण्याचे,पूजा उपासना करण्याचे स्वातंत्र्य असेल परंतु राज्याच्या कक्षेत धार्मिक बाब येत नाही. राज्याने धार्मिक बाबतीत व्यक्तीवर जबरदस्ती करू नये असे लोकचे मत आहे.

लॉकच्या उदारमत्वात हा व्यक्ती वादावर आधारित होता त्याच्या उदारमतवादाचा अभ्यास करताना खालील मुद्दे अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

**1) नैसर्गिक अधिकार**
**2) सामाजिक करार**
**3) मर्यादित सरकार**
**4) कायद्याचे राज्य**
**5) धर्मनिरपेक्षता**
**6) क्रांतीचा अधिकार**

**# नैसर्गिक अधिकार -**

लॉकच्या मते नैसर्गिक अधिकार म्हणजे "व्यक्तीला प्राप्त होणारे जन्मा जात अधिकार होय" यामध्ये जीवन जगण्याचा अधिकार स्वातंत्र्य मालमत्तेचा अधिकार समाविष्ट आहे.

**# सामाजिक करार -**

राज्याची निर्मिती व्यक्तीच्या सहमतीने झालेली आहे व्यक्तीच्या अधिकाराचे संरक्षण करणे हेच राज्याचे कर्तव्य आहे.

**# मर्यादित सरकार -**

लॉकच्या मते सरकारचे अधिकारी मर्यादित असाव्यास हवे व्यक्ती हा महत्त्वाचा असून व्यक्तीच्या अधिकारावर कुठल्याही मर्यादा असू नयेत.

**# कायद्याचे राज्य-**

राज्यालाही कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे. राजा असेल व कोणी सामान्य व्यक्ती जरी असेल तरीही कायदा सर्वांना समान असावा. कायद्यापुढे कोणीही मोठा नाही.

**# धर्मनिरपेक्षता -**

लॉक चा धार्मिक स्वातंत्र्यावर भर होता त्याच्यामध्ये राज्य व धर्म हे वेगवेगळे असावे जेणेकरून धार्मिक स्वातंत्रता राखली जाईल.

**# क्रांतीचा अधिकार -**

जर राज्य नैसर्गिक अधिकाराचे उल्लंघन करत असेल तर लोकांना क्रांती करण्याचा अधिकार आहे. लॉकच्या मते व्यक्तींना अत्याचारी शासनाचा प्रतिकार करण्याचा आणि स्वतःचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे.

**जॉन लॉकच्या उदारमतवादाचा प्रभाव -**

लॉकचा विचारसरणीचा अमेरिकन क्रांती आणि अमेरिकन राज्यघटनेवर मोठा प्रभाव पडला त्याच्या विचारांनी मानवाधिकार,लोकशाही आणि संसदीय प्रणालीच्या विकासाला चालना दिली तसेच उदारमतवादाच्या सिद्धांतावर आधारित अनेक आधुनिक राजकीय विचारसरणी आणि राजकीय प्रणाली विकसित झाल्या आहेत.

**निष्कर्ष -**

जॉन लॉक हे उदारमतवादाचे एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्व होते. त्यांनी नैसर्गिक अधिकार सामाजिक करार आणि राजकीय विचारावर महत्वपूर्ण प्रभाव टाकला आहे त्यांचे विचार आजही राजकीय विचारसरणी आणि लोकशाही प्रणालीसाठी महत्त्वाचे ठरताना दिसत आहेत.

**संदर्भ ग्रंथ -**

1) राज्यशास्त्र सिद्धांत व विचारसरणी -सुनंदा जाधव
2) राजकीय विचारवंत व विचारसरणी -डॉ. शिवाजीराव जगताप
3) पाश्चात्य राजकीय विचारवंत- डॉ. व ग खांडेकर व डॉ. अशोक जावळे
4) राजकीय विचार प्रणाली- प्राध्यापक संतोष पाटील